COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१. Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. ०४.११.२०२०

वाचा :- १. साथरोग प्रतिबंधक कायदा, १८९७

२. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.

३. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

४. मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ दि.३०.०९.२०२०, दिनांक १४/१०/२०२० व दिनांक २९.१०.२०२० व दिनांक ०३.११.२०२०

५. या कार्यालयाचे समक्रमाकिंत आदेश दिनांक ०१.१०.२०२०,दिनांक १४.१०.२०२० व दिनांक ३१.१०.२०२०

**विषयः-** जलतरण तलाव (स्विमींगपूल),योगा प्रशिक्षण संस्था, इन्डोअर हॉलमधील खेळाच्या प्रकारास,सिनेमा हॉल/थिएटर/मल्टीप्लेक्सेस इत्यादींना परवानगी बाबत.

## आदेश

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १४ मार्च २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्तीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

आणि ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या आदेशामध्ये त्या त्या जिल्ह्यातील परिस्थिती प्रमाणे संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील रुग्ण स्थितीनुसार आदेश काढणेबाबत सर्वाधिकार देणेत आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, कंटेन्टमेन्ट झोनच्या बाहेरील जलतरण तलाव (स्विमींगपूल),योगा प्रशिक्षण संस्था, इन्डोअर हॉलमधील खेळाच्या प्रकारास,सिनेमा हॉल/थिएटर/मल्टीप्लेक्सेस ईत्यादींना खालील अटी व शर्ती च्या अधिन राहून दिनांक ०५.११.२०२० रोजी पासून परवानगी देण्यात येत आहे.

१. जे जलतरण तलाव (स्विमींगपूल)राष्ट्रिय व आंतरराष्ट्रिय स्तरावरील खेळाडूंना प्रशिक्षण देण्याकरींता वापरले जातील असे जलतरण तलाव (स्विमींगपूल) दिनांक ०५.११.२०२० रोजी पासून चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. योगा प्रशिक्षण संस्था दिनांक ०५.११.२०२० रोजी पासून चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. सर्व प्रकारचे इन डोअर गेम्स जसे बॅडमिंटन/टेनिस, स्क्वॅश, नेमबाजी, इत्यादींना शारिरीक अंतर व स्वच्छतेचे सर्व नियम पाळून दिनांक ०५.११.२०२० रोजी पासून चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

४. सिनेमा हॉल/थिएटर/मल्टीप्लेक्सेस इ.त्यांच्या क्षमतेच्या ५०% क्षमतेसह दिनांक ०५.११.२०२० रोजी पासून चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे. परंतु सिनेमा हॉल/थिएटर/मल्टीप्लेक्सेस इ. मध्ये प्रेक्षकांना खाद्य पदार्थ नेण्यास परवानगी राहणार असणार नाही.

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१,  Email :nandedrdc@gmail.com

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय दंड संहीता १८६० (४५) च्या कलम १८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतुदी प्रमाणे फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश आज दिनांक ०४ /११/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

स्वाक्षरित/-
(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

प्रतिलीपीः-

१.पोलीस अधीक्षक, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
४. जिल्हा क्रिडा अधिकारी, नांदेड
५. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) नांदेड जिल्हा
६. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी (सर्व) नांदेड जिल्हा
७. मुख्याधिकारी (सर्व) नगरपालिका / नगरपरीषद / नगरपंचायत नांदेड जिल्हा.
८. जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
९. सर्व संबंधितास माहितीस्तव.

जिल्हादंडाधिकारी नांदेड.